**इंदिरा आवास योजनेअंतर्गत जनजाती क्षेत्र उपयोजना (TSP) व जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजनेचा (OTSP) निधी राज्यस्तरावरून PFMS व्दारे वितरीत करण्याबाबत..**

**महाराष्ट्र शासन**
**ग्राम विकास विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः इंआयो-२०१५/प्र.क्र.२५८/योजना-१०**
बांधकाम भवन, २५ मर्झबान रोड,
फोर्ट, मुंबई- ४०० ००१
तारीख: २८ जानेवारी,२०१६.

वाचा §

1. **उप सचिव, भारत सरकार, ग्रामीण विकास मंत्रालय यांचे क्र.M-१२०१८/०२/२०१४-RH (RBS), दिनांक १० एप्रिल, २०१५ रोजीचे पत्र.**
2. **शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.बीयुडी-२०१५/प्र.क्र.२०/कार्यासन-६, दि.७ मे, २०१५.**
3. **शासन निर्णय,ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.इंआयो-२०१५/प्र.क्र.२९०/योजना-१०, दि.२९.५.२०१५.**

प्रस्तावना §

विविध योजनांच्या लाभार्थ्यांच्या बँकेमधील बचत खात्यात थेट रक्कम जमा करण्याची केंद्र शासनाची महत्वाकांक्षी योजना आहे. महाराष्ट्रामध्ये इंदिरा आवास योजनेअंतर्गत लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप पब्लीक फंड मॅनेजमेंट प्रणालीव्दारे (Public Financial Management System) देण्याचे केंद्र शासनाने निदेश दिले आहेत. केंद्र शासनाच्या निदेशानुसार इंदिरा आवास योजनेच्या अ.जा. व सर्वसाधारण संवर्गातील लाभार्थ्यांना PFMS प्रणालीमार्फत निधी वितरण करण्यासाठी सदर योजनेचा निधी राज्यस्तरावरून वितरीत करण्यात आला आहे. अनुसूचित जमाती संवर्गातील लाभार्थ्यांना निधी उपलब्ध करून देण्यासाठी सन २०१५-१६ मध्ये जनजाती क्षेत्र उपयोजना (TSP) व जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजने (OTSP) अंतर्गत जिल्हा नियोजन समितीकडे वितरीत झालेला आहे. सदरचा निधी राज्यस्तरावर उघडण्यात आलेल्या बँक खात्यात जमा करून तो PFMS प्रणालीव्दारे लाभार्थ्यांना वितरीत करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

**शासन परिपत्रक§**

सन २०१५-१६ या वित्तीय वर्षापासून इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या बँक / पोस्ट खात्यामध्ये PFMS (Public Financial Management System) प्रणालीव्दारे थेट अनुदान जमा करण्याचे निदेश केंद्र शासनाने त्यांच्या संदर्भाधीन क्र.१ वरील पत्रान्वये दिले आहेत.

सन २०१५-१६ या वित्तीय वर्षापासून इंदिरा आवास योजनेअंतर्गत जनजाती क्षेत्र उपयोजना (TSP) व जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजना (OTSP) अंतर्गत जिल्हा नियोजन समितीकडे वितरीत झालेला निधी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रेणेमार्फत आहरित करून तो राज्यस्तरावर उघडण्यात आलेल्या बँक खात्यात जमा करण्याची कार्यवाही प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा यांनी करावी.

इंदिरा आवास योजनेअंतर्गत जनजाती क्षेत्र उपयोजना (TSP) व जनजाती क्षेत्राबाहेरील उपयोजना (OTSP) अंतर्गत जिल्हा नियोजन समितीकडे उपलब्ध असलेल्या निधी विचारात घेऊन तेवढाच निधी लाभार्थ्यांना वितरीत होईल यांची दक्षता संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना यांनी घ्यावी.

सदरचे शासन परिपत्रक आदिवासी विकास विभाग यांच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१६०१२७१६१७१८६९२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Anil Madhao Kale

Digitally signed by Anil Madhao Kale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Under Secretary, postalCode=400001, st=Maharashtra, serialNumber=2e952365ef29d1cf1ae e8c19152dd28392d6d29033b24f4cd6 e4a5ac55b4574e, cn=Anil Madhao Kale
Date: 2016.01.28 13:13:59 +05'30'

**(अनिल काळे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. मंत्री ग्राम विकास यांचे सचिव

२. सर्व विभागीय आयुक्त
३. आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक
४. सर्व जिल्हाधिकारी
५. संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-इंदिरा आवास योजना, सी.बी.डी.बेलापूर, नवी मुंबई.
६. वित्त विभाग, कार्यासन क्रमांक व्यय-१५ व अर्थसंकल्प ३ व १७
७. आदिवासी विकास विभाग, कार्यासन क्रमांक ६,१७ मंत्रालय, मुंबई-४०००३२
८. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
९. नियोजन विभाग,मंत्रालय, मुंबई-४०००३२
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
११. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
१२. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखापरिक्षा), मुंबई
१३. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखापरिक्षा) नागपूर
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा अध्यक्ष जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा (सर्व जिल्हे)
१५. प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा ( सर्व जिल्हे )
१६. जिल्हा कोषागार अधिकारी ( सर्व जिल्हे )
१७. अप्पर संचालक,एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम कक्ष,बांधकाम भवन, मुंबई -१ (५ जादा प्रतीसह)
१८. निवड नस्ती (कार्या. योजना-१०)